महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

क्र. पी.आर-३/सबसिडी/ No 09196 दिनांक : 9 APR 2012

## वाणिज्य परिपत्रक क्र. १६२

**विषय :-** सन २०११-१२ च्या खरीप व रब्बी हंगामातील ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांना प्रचलित उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबत.
- थकीत अथवा चालू बिलाच्या कारणास्तव बाधीत कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत न करण्याबाबत.

**संदर्भ :-**
१) शासन निणय क्र. एससीवाय २०११/प्र.क्र. ३२६/भाग १/म-७ दिनांक १८/०१/२०१२.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. १५९ दि. ०२/०३/२०१२.
३) शासन निणय क्र. एससीवाय २०१२/प्र.क्र. ६/म-७ दिनांक ०३/०३/२०१२.
४) पत्र क्र. पीआर-३/सबसिडी/७६४६ दि. २७.०३.२०१२.
५) शासन निणय क्र. एससीवाय २०१२/प्र.क्र. ८८/म-७ दिनांक ३१/०३/२०१२.
६) शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१८३/ऊर्जा-५ दि. ०३/०४/२०१२.

वरील संदर्भ क्र. (१) च्या शासन निर्णयाव्दारे शासनाने खरीप हंगाम २०११-१२ करिता खरीप पिकांची सुधारीत हंगामी पैसेवारी ५० पेक्षा कमी आहे अशा गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर केलेली आहे. शासनाच्या सदर निर्णयाव्दारे उपाययोजना करण्याकरिता संदर्भातील क्र. (२) च्या वाणिज्य परिपत्रकाव्दारे ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलामध्ये ३३ १/३ टक्के इतकी सवलत देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच खरीप हंगामात बाधीत शेतक-यांची वीज जोडणी थकीत बिलासाठी खंडीत करण्यात येऊ नये व फक्त या कारणास्तव खंडीत केली असल्यास तात्काळ पुन्हा जोडण्याची कार्यवाही करावी असेही आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तसेच शासनाने संदर्भातील क्र. (३) च्या निर्णयाव्दारे सन २०११-१२ च्या रब्बी हंगामातील ५० पैसे वा त्यापेक्षा कमी हंगामी पैसेवारी आलेल्या गावांना टंचाई निवारण उपाययोजना लागू केलेली होती. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता संदर्भातील क्र. (४) च्या पत्राव्दारे सन २०११-१२ च्या रब्बी हंगामातील ५० पैसे वा त्यापेक्षा कमी हंगामी पैसेवारी आलेल्या गावांतील बाधीत शेतक-यांची वीज जोडणी थकीत बिलामुळे खंडीत न करणे व खंडीत केली असल्यास तात्काळ पुन्हा जोडाव्यात असे निर्देश निर्गमित करण्यात आलेले होते.

तसेच शासनाच्या प्रचलीत सवलतीच्या दराने चालू वीज देयकाचा भरणा न करणा-या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा नियमानुसार / कायद्यानुसार खंडीत करण्याची कार्यवाही करणे बंधनकारक आहे असेही सुचित करण्यात आलेले होते.

आता शासनाने संदर्भ क्र. (५) च्या शासन निर्णय व संदर्भ क्र. (६) चे शासनाचे पत्रान्वये राज्यामध्ये सन २०११-१२ या वर्षात खरीप व रब्बी पिकांच्या हंगामात ५० पैसापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांमध्ये टंचाईग्रस्त परिस्थिती जाहिर केलेली आहे व त्या अनुषंगाने टंचाईग्रस्त गावामध्ये प्रचलित उपाययोजना व सवलती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर शासनाच्या आदेशानुसार सन २०११-१२ च्या खरीप व रब्बी हंगामात टंचाईग्रस्त जाहिर केलेल्या गावांमध्ये खालीलप्रमाणे सुधारीत उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

**१) सन २०११-१२ च्या खरीप व रब्बी हंगामात टंचाई जाहिर केलेल्या गावातील कृषी ग्राहकांची वीज जोडणी थकीत किंवा चालु देयकासाठी खंडीत करण्यात येऊ नये.**

**२) अशा जोडण्या यापूर्वी खंडीत केल्या असल्यास त्या पुन्हा जोडून देण्यात याव्यात.**

जिल्हा निहाय सन २०११-१२ च्या खरीप व रब्बी हंगामातील टंचाईग्रस्त गावांची यादी त्वरीत जिल्हाधिका-यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी व टंचाईग्रस्त गावांमध्ये वर दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करावी.

या आधी निर्गमित केलेले वाणिज्य परिपत्रक क्र. १५९ दि. ०२/०३/२०१२ व पत्र क्र. पीआर-३/सबसिडी/७६४६ दि. २७.०३.२०१२ रद्द समजण्यात यावे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**

D:\आरबीबी\Subsidy\Draught Kharip & Rabi 2011-12_Circular.doc

## परिशिष्ट -अ

### (१) खरीप हंगाम २०११- २०१२ ची अंतिम पैसेवारी जाहीर केलेल्या गावांची संख्या

| अ.क्र | विभाग | जिल्हा | पैसेवारी जाहिर केलेली गावे (खरीप ) | ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशापेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोंकण | ठाणे | १८८४ | ० | १८८४ |
| | | रायगड | १८९१ | ० | १८९१ |
| | | रत्नागिरी | १५१९ | ० | १५१९ |
| | | सिंधुदुर्ग | ७३५ | ० | ७३५ |
| | **एकूण** | | **६०२९** | **०** | **६०२९** |
| २ | नाशिक | नाशिक | १९६० | ५८१ | १३७९ |
| | | धुळे | ६७९ | १४७ | ५२९ |
| | | नंदुरबार | ८७८ | ४ | ८७४ |
| | | जळगांव | १५०१ | ० | १५०१ |
| | | अहमदनगर | ५८० | ४३१ | १४९ |
| | **एकूण** | | **५५९८** | **११६३** | **४४३२** |
| ३ | औरंगाबाद | औरंगाबाद | ७२८ | ० | ७२८ |
| | | जालना | ५११ | ० | ५११ |
| | | परभणी | ३४५ | ० | ३४५ |
| | | हिंगोली | ६०९ | ० | ६०९ |
| | | नांदेड | १५७५ | ० | १५७५ |
| | | बीड | ७५८ | ० | ७५८ |
| | | लातूर | ९४३ | ३४ | ९०९ |
| | | उस्मानाबाद | ३६२ | ० | ३६२ |
| | **एकूण** | | **५८३१** | **३४** | **५७९७** |
| ४ | पुणे | पुणे | १३७७ | ० | १३६५ |
| | | सातारा | १५३४ | २७४ | १२२९ |
| | | सांगली | ६३० | ३४० | २९० |
| | | सोलापूर | ० | ० | ० |
| | | कोल्हापूर | १२३३ | ० | १२११ |
| | **एकूण** | | **४७७४** | **६१४** | **४०९५** |
| ५ | नागपूर | नागपूर | १८२३ | ४९६ | १३२७ |
| | | वर्धा | १३४५ | ० | १३४५ |
| | | भंडारा | ८४७ | ० | ८४७ |
| | | गोंदिया | ९२३ | ५० | ८७३ |
| | | चंद्रपूर | १३९७ | ० | १३९७ |
| | | गडचिरोली | १४६४ | १११६ | ३४८ |
| | **एकूण** | | **७७९९** | **१६६२** | **६१३७** |
| ६ | अमरावती | अमरावती | १९८५ | १९८५ | ० |
| | | अकोला | १००९ | ० | ९९७ |
| | | यवतमाळ | २१४५ | ० | २०४५ |
| | | बुलढाणा | १४१९ | ७४७ | ६७२ |
| | | वाशिम | ७९३ | ० | ७९३ |
| | **एकूण** | | **७३५१** | **२७३२** | **४५०७** |
| | **एकुणात एकूण** | | **३७३८२** | **६२०१** | **२६४९०** |

## (२) सन २०११-१२ सालातील रब्बी पिकांची अंतिम पैसेवारीचा गोषवारा

| अ.क्र | विभाग | जिल्हा | एकूण गांवे (रब्बी ) | पैसेवारी जाहिर केलेली गावे (रब्बी ) | ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशापेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | कोकणात रब्बी गावे नाहीत. | | | | |
| २ | नाशिक | अहमदनगर | १०१० | १०१० | ६३६ | ३७४ |
| ३ | औरंगाबाद | उस्मानाबाद | ३७५ | ३७५ | ११६ | २५९ |
| ४ | पुणे | पुणे | ५४२ | ५४१ | ८६ | ४५५ |
| | | सातारा | १९३ | १९२ | ७५ | ११७ |
| | | सांगली | १०३ | १०३ | १०३ | --- |
| | | सोलापूर | ११४४ | ११४४ | ४७६ | ६६८ |
| ५ | नागपूर | गडचिरोली | १६४ | १२४ | ६० | ६४ |
| ६ | अमरावती | अमरावती विभागाची रब्बी हंगामी पैसेवारी निरंक आहे. | | | | |
| | एकूण | | ३५३१ | ३४८९ | १५५२ | १९३७ |